# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 06 December 2024

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ०६ डिसेंबर २०२४ दुपारी १.०० वा.

****

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त देशभरात त्यांना अभिवादन करण्यात येत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी भूवनेश्वर इथं आंबेडकर यांना आदरांजली वाहिली.

उपराष्ट्रपती जगदीप धनखड, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी संसद भवन परिसरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आदरांजली वाहिली.

महापरिनिर्वाण दिनानिमित्त बाबासाहेबांना अभिवादन करण्यासाठी मुंबईत दादरच्या चैत्यभूमीवर राज्यभरातून मोठ्या संख्येनं अनुयायी दाखल झाले आहेत.

राज्यपाल सी पी राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी चैत्यभूमी इथं बाबासाहेबांना अभिवादन केलं. यानंतर आयोजित कार्यक्रमात बोलताना राज्यपालांनी, भारताची लोकशाही बळकट करण्याचं काम राज्यघटनेनं केलं असून, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या संविधानामुळे आपला देश उत्तरोत्तर प्रगती करत असल्याचं नमूद केलं. देशाच्या कानाकोपऱ्यातून अस्पृश्यतेचं उच्चाटनं करणं हीच आंबेडकरांना आपण वाहिलेली खरी श्रद्धांजली असेल, असंही ते म्हणाले.

भारत संविधानच्या मार्गानंच जगातली महाशक्ती बनू शकतो, भारताच्या संविधानानुरुप आपलं आचरण असेल आणि कोणत्याही धर्मग्रंथापेक्षा महत्वाचं भारताचं संविधान असेल, असं मुख्यमंत्री फडणवीस यावेळी म्हणाले.

आंबेडकरांचे विचार जागृत ठेवण्यासाठी आम्ही कुठेही कमी पडणार नाही, असं आश्वासन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिलं, तर महायुतीचं सरकार आंबेडकरांचे विचार आणि संविधानाला आदर्श मानून कारभार करेल आणि व्यापक जनहिताचेच निर्णय घेईल, असं अजित पवार यावेळी म्हणाले.

****

नागपुरात दीक्षाभूमी इथं देखील बाबासाहेबांना अभिवादन करण्यासाठी अनुयायांनी गर्दी केली आहे. परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे अध्यक्ष भदंत आर्य नागार्जुन सुरई यांनी बाबासाहेबांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. यावेळी बुद्ध वंदना घेण्यात आली.

****

छत्रपती संभाजीनगर इथल्या फेस ऑफ आंबेडकर राईट मूव्हमेंट अर्थात फॅम या सामाजिक संस्थेच्या वतीने महापरिनिर्वाण दिनानिमित्त भडकल गेट परिसरात ‘एक वही एक पेन’ हे अभियान राबवलं जात आहे. इच्छुकांनी या ठिकाणी एक पेन आणि एक वही संस्थेला द्यावी, त्यानंतर संस्था गरजू विद्यार्थ्यांना त्या वही आणि पेनाचा वितरण करते. याच परिसरामध्ये संविधानाच्या प्रस्तावनेचंही वाचन करण्यात आलं. शहरातील मिलिंद नागसेन वन स्टुडंट्स वेल्फेअर असोसिएशन आणि रिपब्लिकन विद्यार्थी सेना यांच्या संयुक्त विद्यमानाने आज रक्तदान शिबिर घेण्यात येत आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या प्रवेशद्वारासमोर असलेल्या बाबासाहेबांच्या पुतळ्याला अभिवादन करण्यासाठी अनुयायांनी मोठी गर्दी केली आहे.

****

हिंगोली जिल्ह्यात विविध ठिकाणी डॉ. आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी सभा आणि कार्यक्रम होत आहेत. हिंगोली इथल्या डॉक्टर आंबेडकर पुतळा परिसरात अनुयायांची मोठी गर्दी झाली असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

धाराशिव इथं राष्ट्रीय स्वयंसेवक संघ सामाजिक समरसता मंचाच्या वतीने बाबासाहेबांच्या पूर्णाकृती पुतळ्याला अभिवादन करण्यात आलं, तसंच यानिमित्ताने रक्तदान शिबिर घेण्यात येत आहे.

****

वाशिम शहरात महापरिनिर्वाण दिनानिमित्त विविध ठिकाणाहून कँडल रॅली निघून पहाटे साडे पाच वाजता डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौकात पोहचल्या. चौकातल्या पुतळ्याला मान्यवरांनी पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केलं. त्यानंतर भंते प्रज्ञानंद यांनी उपस्थित बुद्ध अनुयायांना त्रिशरण पंचशील दिले.

****

रिझर्व्ह बँकेनं रेपो दर सहा पूर्णांक पाच टक्के इतका कायम ठेवला आहे. बँकेच्या पतधोरण समितीच्या बैठकीनंतर गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी आज ही माहिती दिली. तसंच आर्थिक विकास दर सहा पूर्णांक सहा टक्के राहण्याचा अंदाज दास यांनी वर्तवला आहे. महागाई दरात सप्टेंबर आणि ऑक्टोबरमध्ये मोठी वाढ झाली होती. त्यामुळे चालू आर्थिक वर्षात महागाई दर चार पूर्णांक आठ टक्के राहण्याचा अंदाज आहे. २०२५ मध्ये महागाई दर पहिल्या तिमाहीत चार पूर्णांक सहा, तर दुसऱ्या तिमाहीत चार टक्क्यांवर राहण्याची शक्यताही दास यांनी व्यक्त केली आहे.

****

लोकसभेत आज कामकाज सुरु होताच एका खासगी कंपनीच्या कथित भ्रष्टाचारप्रकरणी काँग्रेससह इतर विरोधी पक्ष सदस्यांनी घोषणाबाजी करण्यास सुरुवात केली. अध्यक्ष ओम बिर्ला यांनी प्रश्नोत्तराचा तास सुरु ठेवण्याचा प्रयत्न केला, मात्र गदारोळ वाढत गेल्यानं सदनाचं कामकाज सुरवातीला १२ वाजेपर्यंत आणि नंतर दिवसभरासाठी स्थगित झालं.

****

मराठवाड्यात आज सर्वत्र पावसाने हजेरी लावली.

छत्रपती संभाजीनगर शहर आणि परिसरात आज सकाळी जोरदार पाऊस झाला. जालना शहरासह जिल्ह्यात पहाटेपासून ढगाळ वातावरण असून, मध्यम स्वरूपाचा पाऊस सुरू आहे. या पावसामुळे वेचणीस आलेल्या कापसासह द्राक्ष बागांना या पावसाचा फटका बसण्याची शक्यता आहे.

****